2 7 MAR 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## इतिहास संशोधक, मराठेशाहीचे भाष्यकार हरपले

# डॉ. जयसिंगराव पवार इतिहासाच्या पडद्याआड

## शासकीय इतमामात झाले अंत्यसंस्कार

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

**ज्येष्ठ इतिहास संशोधक, पुरोगामी विचारवंत, मराठेशाहीचे भाष्यकार डॉ. जयसिंगराव पवार (वय ८५) यांचे कोल्हापुरात निधन झाले. फुफ्फुसाचा संसर्ग झाल्याने गेले दीड महिने रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. गुरुवारी पहाटे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या मागे पत्नी वसुधा, मुलगा पृथ्वीराज, मुली प्रा. डॉ. मंजुश्री पवार व प्रा. डॉ. अरुंधती पवार आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. तत्त्वनिष्ठ, व्यासंगी इतिहास संशोधक हरपला, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. गुरुवारी दुपारी शासकीय इतमामात त्यांच्या पार्थिवावर पंचगंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.**



**श्रद्धांजली विशेष** / पान २

डॉ. पवार यांचे निधन झाल्याचे समजताच लोकांनी सानेगुरुजी वसाहत येथील 'शिवतेज' निवासस्थानी अंतिम दर्शनासाठी गर्दी केली होती. सकाळी साडेदहाच्या सुमारास अंत्ययात्रा फुलांनी सजलेल्या स्वर्गरथ वाहनातून काढण्यात आली.

'अमर रहे, अमर रहे इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार अमर रहे...', 'मराठा, शाहू व ताराराणी इतिहासकार डॉ. पवार अमर रहे...' यासह शिवछत्रपती, राजर्षी शाहू, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावांचा जयघोष करत फुलांनी सजवलेल्या स्वर्गरथातून डॉ. जयसिंगराव पवार यांच्या पार्थिवाची अंत्ययात्रा काढण्यात आली. मार्गावर पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली.

पंचगंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार झाले. कोल्हापूर पोलिस दलाच्या बँड पथकाने सलामीची धून वाजवल्यानंतर पोलिसांच्या तुकडीने शिस्तबद्ध संचलन करत आकाशात तीन बुलेट फायर करत मानवंदना दिली. यानंतर खासदार शाहू महाराज, दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, माजी खासदार संभाजीराजे, माजी आमदार मालोजीराजे, आ. जयंत आसगावकर, मनपाचे विरोधी पक्षनेते राजेश लाटकर, नगरसेवक आदिल फरास, जिल्हाधिकारी अमोल येडगे, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., पोलिस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता, डीवायएसपी प्रिया पाटील यांनी पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली वाहिली.

पुरोगामी विचारांचा वारसा जपत कोणतेही विधी न करता रक्षा शेतात विसर्जित करण्यात येणार असल्याचे पवार कुटुंबीयांनी यावेळी जाहीर केले.

/ संबंधित वृत्त पान ३

### विविध संस्थांच्या माध्यमातून सक्रिय

१९९२ मध्ये डॉ. जयसिंगराव पवार यांनी महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी संस्थेची स्थापना केली. शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्राचे ते संचालक होते. महाराष्ट्राचा इतिहास, राजर्षी शाहू चरित्र व कोल्हापूरचा पंचखंडात्मक इतिहास आदी ग्रंथांचे संपादन त्यांनी केले. दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांच्या सहस्रचंद्र दर्शन सोहळ्यानिमित्त प्रकाशित होत असलेल्या 'समग्र कोल्हापूर' या ग्रंथाच्या संपादन मंडळाचे डॉ. पवार हे प्रमुख होते.

पुढारी

# डॉ. आलोक जत्राटकर यांच्या पुस्तकाला पुरस्कार

**कोल्हापूर :** येथील शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी तथा लेखक डॉ. आलोक जत्राटकर यांच्या 'समाज आणि माध्यमं' या वैचारिक लेखसंग्रहाला वर्धा येथील मारोतराव नारायणे स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा सन २०२६ चा मारोतराव नारायणे राज्यस्तरीय उत्कृष्ट वैचारिक साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. प्रमोद नारायणे यांनी ही घोषणा केली आहे. रुपये ६ हजार रोख रक्कम, मानपत्र व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

मारोतराव नारायणे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शनिवार, दि. २५ एप्रिल, २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता वर्धा येथील स्थानिक सार्वजनिक बजाज वाचनालयाच्या सभागृहात सुप्रसिद्ध साहित्यिक व 'उपरा'कार लक्ष्मण माने यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येईल, असे मारोतराव नारायणे स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. डॉ. प्रमोद नारायणे, सचिव हेमलता नारायणे, प्रतिष्ठानचे कार्यकारिणी सदस्य प्रभावती नारायणे, अजय भस्मे, धीरज नारायणे, राहुल भस्मे, जिगिषा नारायणे यांनी कळवले आहे.

27 MAR 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. जयसिंगराव पवार यांना अखेरचा निरोप

## फुलांनी सजविलेल्या स्वर्गरथातून निघाली अंत्ययात्रा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना जनसमुदायाने साश्रुनयनांनी अखेरचा निरोप दिला. पंचगंगा स्मशानभूमीत शासकीय इतमामात डॉ. पवार यांच्यावर विधिवत अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी, डॉ. पवार यांच्या पार्थिवावर खा. शाहू महाराज व दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी पुष्पचक्र अर्पण केले.

अंत्ययात्रा व अंत्यसंस्कारावेळी माजी खासदार संजय मंडलिक, शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. दिगंबर शिर्के, उपमहापौर अक्षय जरग, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, मधुरिमाराजे, इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव, डॉ. वसंतराव मोरे, इंद्रजित सावंत, डॉ. सदानंद कदम, उमाकांत राणिंगा, व्ही. बी. पाटील, आर. के. पोवार, वसंतराव मुळीक, बबनराव रानगे, सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिपूरकर, कॉ. दिलीप पवार, दलितमित्र व्यंकाप्पा भोसले, ॲड. बाबा इंदुलकर, दिलीप देसाई, उमेश पोवार, ॲड अभिषेक मिठारी, ऋतुराज इंगळे, बाळ पाटणकर, निलराजे पंडित-बावडेकर, उदय गायकवाड, नगरसेवक विनायक फाळके, संजय सावंत, शारंगधर देशमुख, विजयसिंह देसाई, इंद्रजित बोंद्रे, राहुल माने, प्रताप जाधव, कॉम्रेड चंद्रकांत यादव, रघुनाथ कांबळे, गिरीश फोंडे, प्रा. जे. के. पवार, नवभारत शिक्षण संस्था सांगलीचे गौतम पाटील, विजय साळोखे-सरदार, पुंडलिक जाधव, डॉ. अमर अडके, डॉ. मेघा पानसरे, पुरालेखाधिकारी गणेश खोडके, फत्तेसिंग सावंत, हेमंत साळोखे, संजय पवार, गणी आजरेकर, शाहीर दिलीप सावंत, शाहीर आझाद नायकवडी, आर्किटेक्ट अभिजित जाधव-कसबेकर, शफीक देसाई, फिरोज खान उस्ताद, दगडू भास्कर, सुनीलकुमार लवटे, डॉ. संदीप पाटील, सीमा पाटील, उमेश सूर्यवंशी, अजेय दळवी, सुधर्म वाझे, विजय देवणे, संभाजीराव जगदाळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, संस्था-संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, माजी खासदार राजू शेट्टी व मराठी भाषा संवर्धन चळवळीचे दीपक पोवार यांनी पवार कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले.



कोल्हापूर : डॉ. जयसिंगराव पवार यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करताना खा. शाहू महाराज व दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव.

### रविवारी शोकसभा...

डॉ. जयसिंगराव पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सर्वपक्षीय व व्यापक शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. २९ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता राजर्षी शाहू समाधिस्थळ, नर्सरी बाग, टाऊन हॉल येथे ही शोकसभा होणार आहे. यावेळी नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



कोल्हापूर : पोलिस दलाने शिस्तबद्ध संचलनासह बंदुकीतून तीन राऊंड फायर करत शासकीय मानवंदना दिली. (छाया : मिलन मकानदार)

### शासकीय इतमामासाठी डॉ. जाधव यांचे प्रयत्न

महाराष्ट्र आणि मराठ्यांच्या इतिहासासाठी आपली संपूर्ण हयात खर्ची घालणाऱ्या इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचा मरणोत्तर योग्य सन्मान व्हावा, यासाठी त्यांच्यावर शासकीय इतमामातच अंत्यसंस्कार व्हावेत, अशी कोल्हापूरच्या नागरिकांची इच्छा होती. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या परवानगीशिवाय मंत्री, लोकप्रतिनिधींसह कोणालाही शासकीय मानवंदना देता येत नसल्याची माहिती जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी दिली. लोकभावना लक्षात घेऊन दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मोबाईलवरून मेसेज पाठवला. त्या मेसेजला मुख्यमंत्र्यांनी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार केले जातील, असे उत्तर पाठविले. यानंतर डॉ. जाधव यांनी जिल्हाधिकारी येडगे यांना फोनवरून माहिती देऊन शासकीय इतमामात अंत्यसंस्काराबाबत सूचना केली. मुख्यमंत्री नागपूर येथील रामनवमीच्या कार्यक्रमात असल्याने त्यांच्याशी संपर्क होत नव्हता. डॉ. जाधव यांनी त्यांच्याशी संपर्क साधून डॉ. पवार यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यासाठी पुढाकार घेतला.

27 MAR 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठा इतिहास संशोधनातून डॉ. पवार अजरामर

## राजर्षि शाहूंचे कार्य पोहोचविले जगभर : छत्रपती संभाजी महाराज स्मारक ग्रंथातून संभाजीराजेंना दिला न्याय

जनप्रवास : महेश गावडे

इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार हे हाडाचे संशोधक होते. ते पुराव्याशिवाय कोणतीही गोष्ट ग्राह्य मानत नव्हते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य छत्रपती ताराराणी, संभाजीराजे छत्रपती आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या अर्थात मराठा इतिहासाच्या अभ्यासासाठी तहह्यात वाहून घेतले. १८५४ साली ब्रिटिश अधिकारी ग्रॅहम यांनी कोल्हापूरवर तयार केलेल्या अतिशय दुर्मिळ ग्रंथाचे डॉ. पवार यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक संपादित करुन सुमारे २०० वर्षापूर्वीचा इतिहास कोल्हापूरकरांसमोर ठेवला. तर इतिहास अभ्यासक लट्टे यांचे शाहू चरित्र उपलब्ध होत नव्हते. ते पुनर्प्रकाशित केले. लाटकर यांनी संस्कृतमध्ये लिहिलेले शाहू चरित्र डॉ. पवार यांनी मराठीकरण केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांचे ताराबाई, जिजाबाई कालीन, शाहू कालीन ग्रंथांचे शाहू केंद्रातर्फे पुनर्प्रकाशन झाले. या सर्व कार्यात डॉ. पवार यांचे मोठे योगदान होते. आज डॉ. पवार दुर्दैवाने ह्यात नाहीत, मात्र, त्यांनी मराठा इतिहास संशोधनात करुन ठेवलेले काम मात्र अजरामर ठरले. डॉ. पवार यांना लोकराजा शाहू महाराजांचे कार्य जगभर पोहोचवण्याचे श्रेय जाते, ते याचसाठी.

शिवाजी विद्यापीठाची स्थापना १९६२ साली झाली आणि विद्यापीठात १९६४ साली इतिहास विभाग सुरु झाला. डॉ. जयसिंगराव पवार यांनी प्रारंभी याच विभागात प्राध्यापक म्हणून काम करत असतना डॉ. आप्पासाहेब पवार



यांच्याकडून मराठा इतिहास संशोधनाचे धडे गिरवले. त्यानंतर त्यांनी काही काळ गोखले कॉलेज, दसरा चौकातील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम पाहिले. ते विद्यार्थीप्रिय प्राध्यापक होते. ते कोणत्याही विषयाचा अभ्यास करताना रेकॉर्ड ऑफिसला जात असत आणि दुर्मिळ कागदपत्रांचा अभ्यास करत असत.

१६८९ ते १७०७ या काळात मराठा आणि मोघल यांच्यात संघर्ष झाला. ज्यावेळी संभाजीराजे यांना बंदी बनवले. त्याचदरम्यान, छत्रपती ताराराणी, राजाराम महाराज, शाहू महाराज यांच्या इतिहासाबद्दलचा त्यांनी अभ्यास केला. त्यांच्या पीएचडीचा विषय याच विषयावर होता. मात्र, या विषयासाठी त्यांनी कोणाला गाईड अर्थात मार्गदर्शक म्हणून घेतले नव्हते. या विषयावरील प्रबंध त्यांनी पदवी प्राप्त झाल्यावर प्रकाशित केला.

प्राचीन कोल्हापूर शहराचा इतिहास ५ खंडात प्रकाशित करण्याचा प्रकल्पावर ते काम करत होते. सहा महिन्यांपूर्वी यातील पहिला खंड प्रकाशित झाला. डॉ. पवार यांचे शैक्षणिक व इतिहास क्षेत्रातील सर्वात मोठे काम म्हणजे ग्रॅहम रिपोर्ट हा १८५४ सालीचा ग्रंथ म्हणावा लागेल. ब्रिटिश अधिकारी ग्रॅहम यांनी कोल्हापूरवर तयार केलेल्या अतिशय दुर्मिळ ग्रंथाचे डॉ. पवार यांनी अभ्यासपूर्वक संपादित करुन सुमारे २०० वर्षापूर्वीचा इतिहास कोल्हापूरकरांसाठी उपलब्ध केला. हा ग्रंथ अतिशय दुर्मिळ असा होता. या पुस्तकाची निर्मिती करत असताना काही प्रती मुंबई, पुण्यातून आणल्या होत्या. याशिवाय कोल्हापूर जिल्ह्याचा पंचखंडीय इतिहास या नावाचे प्रकल्प शिवाजी विद्यापीठाने हाती घेतला होता. यात आर्वाचीन व प्राचीन कोल्हापूरचा संपूर्ण इतिहास मांडायचा होता. यातील पहिला खंड गेल्यावर्षी प्रकाशित केला. या ग्रंथ प्रकाशनात डॉ. पवार यांचे मोठे योगदान राहिले. इतकेच नाही तर राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणेवर आधारित बृहत ग्रंथांची निर्मिती डॉ. पवार यांनी केली. यावरुन त्यांच्या एकूणच कामाचा अवाका लक्षात यावा. यातील काही ग्रंथ जर्मनी आणि इंग्रजीत भाषांतरित झाले. हे लक्षात घेतले तर डॉ. पवार यांना लोकराजा शाहू महाराजांचे कार्य जगभर पोहोचवण्याचे श्रेय जाते. डॉ. पवार यांच्या मराठा इतिहासावर आधारित क्रमिक पाठ्यपुस्तके ही बी.ए. आणि एम.ए. अभ्यासक्रमात अंतर्भूत केली आहेत. डॉ. पवार यांनी मराठा इतिहास परिषद स्थापन केली. तर भारतीय इतिहास संकलन समितीवर त्यांचे विशेष प्रेम आणि लक्षही होते. भारतीय इतिहास संकलन समितीचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. बी. डी. खणे आणि समितीचे उपाध्यक्ष उमाकांत राणिंगा यांनी डॉ. जयसिंगराव पवार यांच्याबरोबर काम केले होते. या दोघा मान्यवरांनी डॉ. पवार यांच्या अद्वितीय कार्याबद्दलची माहिती दै. जनप्रवासशी बोलताना दिली.

### स्वराज्य रक्षक संभाजीराजेंना न्याय देण्याचे काम

छत्रपती शिवाजी महाराजांनंतर औरंगजेबाविरुद्ध स्वराज्य टिकवण्यात ताराबाईंचा मोलाचा वाटा होता, हे पुरेशा पुराव्यानिशी सिद्ध करून त्यांनी इतिहासाच्या मांडणीला नवे वळण दिले. स्वराज्य रक्षक संभाजीराजेंबद्दल जे चुकीचे लिहिण्यात आले होते. ते छत्रपती संभाजी महाराज स्मारक ग्रंथ प्रसिध्द करुन संभाजीराजेंना न्याय देण्याचे काम डॉ. पवार यांनी खऱ्या अर्थाने केले.

### शाहू महाराजांची खरी जन्मतारीख शोधण्यास दिग्गजांसह केला पाठपुरावा

राजर्षी शाहू महाराज यांची जयंती दरवर्षी २६ जुलैरोजी साजरी केली जात होती. त्यांची जन्मतारीख २६ जुलै १९७४ अशी मानली जात होती. हे बऱ्याच वर्षापासून सुरुच होते. मात्र, ॲड. मानसिंगराव खांडेकर यांनी शाहू महाराजांच्या जन्माची खरी तारीख शोधली. २६ जुलै नसुन ती २६ जून असल्याचे पुराव्यानिशी सिध्द केले. यासाठी इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. रमेश जाधव यांच्यासारख्या दिग्गजांनी शासकीय स्तरावर पाठपुरावा केला. त्यानंतर शासनाबरोबरच इतिहासकारांनीही तारीख मान्य केली. डॉ. पवार यांचे एक वैशिष्ट्य होते. ते पुराव्याशिवाय काही बोलत नसत आणि मांडतही नसत.

### संशोधनासाठी पवार कुटुंबीयाने आयुष्यच वाहून घेतले

डॉ. पवार यांच्या पत्नी (सायबरचे संस्थापक ए. डी. शिंदे आणि माजी आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या भगिनी) वसुधाताईसुध्दा इतिहास अभ्यासक आहेत. याशिवाय त्यांच्या ज्येष्ठ कन्या डॉ. अरुंधती पवार या इंग्रजीच्या प्राध्यापिका आहेत. तर डॉ. मंजूश्री पवार यादेखील इतिहास विषयाच्या प्राध्यापक असून इतिहास संशोधक आहेत. मुलगा पृथ्वीराज पवार हे भारती विद्यापीठात मॅनेजमेंट कॉलेजमध्ये कार्यरत आहेत. अर्थात सर्व पवार कुटुंबीयाने मराठा इतिहासावरील अभ्यास, संशोधनासाठी आयुष्यच अक्षरशः वाहूनच घेतले आहे.

...विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAR 2026
पुढारी

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे जाणे हे दुर्दैवी आहे. निवृत्तीनंतर दीर्घकाळ विद्यापीठात शाहू संशोधन केंद्रात नाममात्र एक रुपया मानधनावर संचालक म्हणून कार्य केले. या काळात अनेक ग्रंथांचे काळानुरूप संपादन करून ते विद्यापीठमार्फत प्रसिद्ध केले. त्यांचे जाणे ही समाजाची मोठी हानी आहे.

- **डॉ. सुरेश गोसावी,**
प्रभारी कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

पुढारी

ज्येष्ठ इतिहास संशोधक जयसिंगराव पवार यांनी विद्यापीठ शाहू संशोधन केंद्रात केलेले कार्य अनमोल आहे. इतिहासातील कोल्हापूरचे अभ्यासू व्यक्तिमत्त्व गमावले आहे, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

- **डॉ. ज्योती जाधव,**
प्रभारी प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

पुढारी

डॉ. जयसिंगराव पवार कधीही पुराव्याशिवाय इतिहास लिहीत नसत. मराठा इतिहासाच्या कागदपत्रांवर त्यांचे जे प्रगाढ प्रभुत्व होते. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राने एक पुरावाधिष्ठित आणि विवेकी इतिहासकार गमावला.

- **डॉ. अवनीश पाटील,**
प्रमुख, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ

27 MAR 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्रद्धांजली

# डॉ. जयसिंगराव पवार : इतिहास मांडणीचा आधारवड !

**महाराष्ट्रात इतिहास संशोधनाची कास धरणे म्हणजे वैचारिक वादळांना सामोरे जाणे ! डॉ. जयसिंगराव पवारांनी ससंदर्भ इतिहास मांडणी करून हे आव्हान पेलले.**




इंद्रजित सावंत
इतिहास संशोधक
कोल्हापूर

**महाराष्ट्राने** आपल्या कर्तृत्वाने इतिहास निर्माण केला आहे. या मराठी भूमीत शिवछत्रपतींपासून ते आधुनिक काळातील राजर्षी शाहू महाराजांपर्यंत अनेक महामानव जन्माला आले. परंतु, इतिहास घडवणाऱ्या महाराष्ट्राने इतिहास लेखन आणि संशोधनाकडे मात्र काही प्रमाणात दुर्लक्ष केलेले दिसते. इतिहासाची साधने शोधून काढणे, त्यांची चिकित्सा करणे आणि त्यांना प्रासादिक भाषेत मांडणे हे अत्यंत अवघड कार्य. इतिहास कथा, कादंबऱ्या, नाटके, चित्रपट, चित्र, शिल्प अशा विविध माध्यमांतून मांडला जातो; परंतु सत्य इतिहास मांडायचा असेल, तर तो कागदपत्रांच्या साक्षीवरच मांडावा लागतो.

महाराष्ट्राने इतिहासाच्या मांडणीत जेवढी मतमतांतरे आणि वादळे पाहिली, विशेषतः मध्ययुगीन इतिहासाच्या संदर्भात, तेवढी मतभेदांची वादळे जगभरात फारच कमी आढळतात. महाराष्ट्रात इतिहास संशोधनाची कास धरणे म्हणजे वैचारिक वादळांना सामोरे जाण्यासारखे आहे. डॉ. जयसिंगराव पवार या व्यक्तीने ससंदर्भ इतिहास मांडणी करताना या मतभेदांच्या वादळांवर स्वार होत छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महाराणी ताराबाई साहेब अशा महान व्यक्तींच्या इतिहासाची चिकित्सक मांडणी केली. त्यांनी मांडलेल्या काही भागांवर मतभेद असले, तरी बहुतांश मांडणीवर महाराष्ट्रातील संशोधकांचे एकमत झालेले दिसते. याचे श्रेय त्यांच्या सत्यान्वेषी वृत्तीला आणि 'नो डॉक्युमेंट नो हिस्टरी' या त्यांच्या भूमिकेला जाते.

डॉ. जयसिंगराव पवार यांनी शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू आणि नामवंत इतिहास संशोधक डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या शिस्तबद्ध मार्गदर्शनाखाली इतिहास संशोधनाचे आणि लेखनाचे धडे घेतले. तब्बल ५० वर्षांपूर्वी शिवाजी विद्यापीठातून सुरू केलेले संशोधन कार्य त्यांनी आपल्या समर्थ लेखणीने पुढे नेले. इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात एखादा संशोधक मध्ययुगापासून ते आधुनिक काळापर्यंत प्रभावीपणे कार्य करू शकतो, याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे डॉ. पवार यांचे लेखन होय.



डॉ. पवार यांचा संशोधन विषय शिवपुत्र राजाराम महारानांच्या इतिहासाशी संबंधित होता. छत्रपती संभाजी महाराजांच्या हौतात्म्यानंतर स्वराज्याची धुरा जवळपास ११ वर्षे समर्थपणे सांभाळणाऱ्या आणि औरंगजेबाला झुंज देणाऱ्या या शिवपुत्राचे कार्य त्यांनी संशोधनातून प्रकाशात आणले. यासाठी त्यांनी रायगड ते जिंजी किल्ला प्रवास करून अभ्यास केला. राजाराम महाराजांच्या अभ्यासादरम्यान त्यांचे लक्ष करवीर संस्थानाच्या संस्थापिका महाराणी ताराबाई साहेबांच्या इतिहासाकडे गेले. त्यामुळे त्यांनी 'महाराणी ताराबाई' हा ग्रंथ लिहिला. पुढे अधिक सखोल अभ्यास करून 'मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई' या नावाने त्यांनी त्यांच्या जीवनकार्याचे विस्तृत चरित्र सादर केले. डॉ. पवार यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित 'छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ' हा ग्रंथ संपादित केला. बखरी, कथा, चित्रपट आणि कादंबऱ्यांमुळे निर्माण झालेल्या संभाजी महाराजांच्या प्रतिमेवरील गैरसमज दूर करून त्यांनी त्यांच्या पराक्रमाचे खरे स्वरूप लोकांसमोर आणले. इतिहास संशोधन करत असतानाच त्यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा सखोल अभ्यास करून 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ' तयार केला. हा ग्रंथ संशोधन, संपादन आणि लेखन यांचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. शाहू महाराजांचे विचार केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता देश-विदेशात पोहोचावेत, यासाठी त्यांनी त्यांच्या चरित्राचे विविध भाषांमध्ये भाषांतर व्हावे, यासाठी प्रयत्न केले.

इतिहास लेखन आणि संशोधनापुरते मर्यादित न राहता त्यांनी 'महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी' सारखी संस्था स्थापन केली आणि अनेक संशोधक घडवले. शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्राचे संचालक म्हणून त्यांनी अनेक ऐतिहासिक कागदपत्रे पुन्हा प्रकाशित करून संशोधकांसाठी उपलब्ध करून दिली. ताराबाईकालीन आणि जिजाबाईकालीन कागदपत्रांचे पुन:प्रकाशन तसेच विविध ग्रंथांचे संपादन आणि प्रकाशन हे त्यांच्या कार्यातील महत्त्वाचे पैलू आहेत. अनेक संशोधक आणि इतिहासप्रेमींना त्यांचा मायेचा धाक होता. डॉ. पवार हे महाराष्ट्राच्या इतिहास मांडणीचे खरे आधारवड होते. त्यांच्या निधनाने हा आधार आता हरपला आहे!

indraswords@gmail.com

जनसंपर्क कक्ष

27 MAR 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात 'आजी-माजी विद्यार्थी-पालक मेळावा'

## विविध कलाविष्कारांनी रंगली 'आजी-माजी विद्यार्थी-पालक' स्नेहसंमेलनाची मैफल



**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ येथील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने बुधवारी 'आजी-माजी विद्यार्थी आणि पालक मेळाव्या'चे आयोजन केले होते. अधिविभागाच्या मुख्य ऑडिटोरियममध्ये सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम पार पडला.

या मेळाव्याचे मुख्य आकर्षण विद्यार्थ्यांचे वैविध्यपूर्ण कलाविष्कार ठरले. भरतनाट्यमच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या सुंदर नृत्याविष्काराने कार्यक्रमाची दिमाखदार सुरुवात झाली. अधिविभागातील चित्रकलेच्या विद्यार्थ्यांनी काढलेली सुरेख व्यक्तिचित्रे, निसर्गचित्रे आणि रेखाचित्रे, रांगोळी यांची प्रात्यक्षिके लक्षवेधी ठरली. हार्मोनियमच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले सामूहिक वादन कौतुकास पात्र ठरले.

नाट्यशास्त्र सर्टिफिकेट आणि डिप्लोमाच्या विद्यार्थ्यांनी 'विंडो सीट' ही लघुनाटिका सादर केली. तसेच, सद्यस्थितीतील 'वृक्षतोड' या ज्वलंत विषयावर आधारित 'घुसखोर' या मूकनाट्याने उपस्थितांना अंतर्मुख केले. विजया पाटील आणि आर्या मोहिरे यांनी 'संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाची माहिती व वाटचाल' या विषयावर सादर केलेले संवादरुपी 'प्रहसन' अत्यंत लक्षवेधी आणि माहितीपूर्ण ठरले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्र. विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले. प्रसिद्ध कवी व अधिविभागाचे विद्यार्थी डॉ. चंद्रकांत पोतदार यांनी आपल्या भाषणामध्ये कलेचे महत्व अधोरेखित केले. सूत्रसंचालन अतुल परीट यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विकास कांबळे, राज पाटील, अमित साळोखे, पद्मश्री बागडेकर, संदेश गावंदे आणि ओंकार सूर्यवंशी, बबन माने व विजय उपाध्ये यांनी परिश्रम घेतले. ध्वनिव्यवस्था विक्रम परीट व डॉ. संजय तोडकर यांनी सांभाळली, तर तांत्रिक बाजूची धुरा मल्हार जोशी यांनी यशस्वीपणे पेलली.

27 MAR 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सौंदर्य विवेकातही प्रतिबिंबित व्हावे : डॉ. माया पंडित

## शिवाजी विद्यापीठात 'नकाब' एकांकिकेचे सादरीकरण : संवेदनशीलता माणसाला खऱ्या अर्थाने सुंदर बनवते

**जनप्रवास : कोल्हापूर**

सौंदर्य ही केवळ बाह्य गोष्ट नसून, ती आपल्या विचारांमध्ये आणि विवेकातही प्रतिबिंबित व्हायला हवी. आपण जे पाहतो, तेच सत्य असतेच असे नाही; 'नकाब' आपल्याला या आभासी जगाचे भान करून देते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. माया पंडित यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे शरण साहित्य अध्यासन, अहिल्यादेवी होळकर अध्यासन, हिंदी अधिविभाग आणि विवेक वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने ओंकार वर्णे लिखित व दिग्दर्शित 'नकाब' या एकांकिकेचे सादरीकरण आणि त्यावर मुक्तसंवाद अशा संयुक्त कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यावेळी मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर मार्गदर्शक म्हणून, तर वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वर्षा मैंदर्गी अध्यक्षस्थानी होत्या.




**कोल्हापूर : एकांकिका सादरीकरण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. वर्षा मैंदर्गी. सोबत डॉ. तृप्ती करेकट्टी, माया पंडित, मच्छिंद्र गोफणे, आलोक जत्राटकर आदी.**

नकाब या एकांकिकेच्या सादरीकरणाचे कौतुक करताना डॉ. पंडित म्हणाल्या, शारीरिक अभिव्यक्तीचे आकर्षण क्षणिक असते; पण विचारांची खोली आणि संवेदनशीलता माणसाला खऱ्या अर्थाने सुंदर बनवते, हे 'नकाब' खूप प्रत्ययकारकपणे दाखवते. माध्यमांनी निर्माण केलेल्या सौंदर्याच्या साच्यांमध्ये अडकून न राहता, स्वतःची ओळख शोधणे अधिक महत्त्वाचे आहे. सौंदर्यस्पर्धा आपल्याला एक प्रतिमा देतात; पण त्या प्रतिमेपलीकडील वास्तव समजून घेणे हीच खरी जाणीव आहे. तरुणाईने बाह्य आकर्षणाच्या मोहापेक्षा विवेक, मूल्ये आणि आत्मभान यांना प्राधान्य द्यायला हवे. शरीर आणि विचार यांचा समतोल साधला, तरच व्यक्तिमत्त्व परिपूर्ण बनते. महिलांची या वस्तुकरणातून सुटका करणे हीच आजघडीची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

डॉ. वर्षा मैंदर्गी म्हणाल्या, महिला दिन हा केवळ उत्सव नसून, महिलांच्या आत्मसन्मान, समानता आणि स्वनिर्णयाच्या अधिकाराचा पुनरुच्चार आहे. सौंदर्याच्या संकल्पना बदलताना,महिलांनी स्वतःची ओळख आणि मूल्ये यांना केंद्रस्थानी ठेवणे,हेच खरे सक्षमीकरण आहे. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. जयसिंग कांबळे, प्रकाश निकम यांनी सूत्रसंचालन केले. चैत्रा राजाज्ञा यांनी आभार मानले. कार्यक्रमास सुरेश शिपूरकर, डॉ. अनमोल कोठडिया, डॉ. चैत्रा राजाज्ञा, मच्छिंद्र गोफणे, सरला पाटील, भारती पोवार, सुरेखा आडके, विलास आंबोळे, सुभाष महाजन, चंद्रशेखर बटकडली, यश आंबोळे, स्वाती कृष्णात, रेश्मा खाडे, ॲड. अंकिता त्रिभुवने, शुभांगी चितारी, महानंदा पाटील आदी उपस्थित होते. ओंकार वर्णे लिखित व दिग्दर्शित'नकाब'या मालिकेच्या सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

जनसंपर्क कक्ष
27 MAR 2026 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्त्री प्रश्नांच्या जाणिवेसाठी फोडले भ्रमाचे फुगे

## शिवाजी विद्यापीठात मुक्तसंवादात शरीर सौंदर्यावर चर्चा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २६ : मुलगी शिकली; पण शिक्षणाचे उपयोजन काय?, महिला कमावत्या झाल्या; पण खर्चाचे स्वातंत्र्य आहे का?, समाजात सर्वत्र मुक्त संचार; पण सुरक्षित भवताल दिला का?, असे भ्रम आणि वास्तव पुरुषी मानसिकतेतून समाजात निर्माण झाले. महिलांच्या उदात्तीकरणाचे असे भ्रमाचे फुगे चिकित्सेच्या टाचणीने फोडून वास्तवातील स्त्री प्रश्नांची जाणीव करून घेण्याची प्रतिकात्मक कृती करीत अभिनव पद्धतीने शिवाजी विद्यापीठात मुक्तसंवादाचे उद्घाटन करण्यात आले.

विद्यापीठाचे शरण साहित्य अध्यासन, अहिल्यादेवी होळकर अध्यासन, हिंदी अधिविभाग आणि विवेक वाहिनी यांनी घेतलेल्या ओंकार वर्णे लिखित व दिग्दर्शित 'नकाब' या एकांकिकेचे सादरीकरण आणि त्यावर मुक्तसंवाद कार्यक्रम झाला. त्याच्या उद्घाटनप्रसंगी



शिवाजी विद्यापीठ : मुक्तसंवादाचे अभिनव पद्धतीने उद्घाटन करताना डॉ. वर्षा मैंदर्गी. यावेळी शेजारी तृप्ती करेकट्टी, माया पंडित, आलोक जत्राटकर, मच्छिंद्र गोफणे, चैत्रा राजाज्ञा उपस्थित होते.

ज्येष्ठ विचारवंत डॉ. माया पंडित यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर मार्गदर्शक म्हणून, तर वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वर्षा मैंदर्गी अध्यक्षस्थानी उपस्थित होत्या.

डॉ. पंडित म्हणाल्या, शारीरिक अभिव्यक्तीचे आकर्षण क्षणिक असते; पण विचारांची खोली आणि संवेदनशीलता माणसाला खऱ्या अर्थाने सुंदर बनवते, हे 'नकाब' प्रत्ययकारकपणे दाखवते. डॉ. जत्राटकर म्हणाले, सौंदर्यस्पर्धा या केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नसून, त्या जागतिक भांडवलशाहीच्या बाजारपेठेचे प्रभावी साधन आहेत. डॉ. मैंदर्गी म्हणाल्या, सौंदर्याच्या संकल्पना बदलताना महिलांनी स्वतःची ओळख आणि मूल्ये यांना केंद्रस्थानी ठेवणे, हेच खरे सक्षमीकरण आहे.

सुरेश शिपूरकर, अनमोल कोठडिया, मच्छिंद्र गोफणे, सरला पाटील, भारती पोवार, सुरेखा आडके, विलास आंबोळे, सुभाष महाजन, चंद्रशेखर बटकडली, यश आंबोळे, स्वाती कृष्णात, रेश्मा खाडे, अंकिता त्रिभुवने, शुभांगी चितारी, महानंदा पाटील, आदी उपस्थित होते. तृप्ती करेकट्टी यांनी स्वागत केले. जयसिंग कांबळे, प्रकाश निकम यांनी सूत्रसंचालन केले. चैत्रा राजाज्ञा यांनी आभार मानले.

### 'नकाब' एकांकिका...

**शरीर सौंदर्याच्या अशाश्वततेवर भाष्य करणाऱ्या या एकांकिकेत सौंदर्याच्या प्रचलित कृत्रिम संकल्पनांत अडकत जाऊन स्वतःचे अस्तित्व हरवून बसणाऱ्या एका तरुणीच्या स्वप्नांची ही कथा आहे. मानसी बोलुरे हिने मध्यवर्ती व्यक्तिरेखा साकारली आहे. ओंकार, रमा घोलकर, साहिल बारस्कर, ऋतुराज पाटील, करण शेडगे, मयंक जैन, पवन यांनी भूमिका केल्या. प्रीतेश पटेल यांचे पार्श्वसंगीत, तर पार्थ घोरपडे यांनी प्रकाशयोजना केली.**

27 MAR 2026

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाची मोठी हानी

मराठा इतिहासाचे गाढे अभ्यासक असलेल्या डॉ. जयसिंगराव पवार यांच्या जाण्याने समाजासह शिवाजी विद्यापीठाची मोठी हानी झाली आहे. शहाजी महाविद्यालय येथून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी दीर्घकाळ विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्रात नाममात्र एक रुपया मानधनावर संचालक म्हणून कार्य केले. या काळात अनेक ग्रंथांचे काळानुरूप संपादन करून ते विद्यापीठामार्फत प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

– डॉ. सुरेश गोसावी,
प्रभारी कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 7 MAR 2026 सकाळ



शिवाजी विद्यापीठ : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात 'आजी-माजी विद्यार्थी आणि पालक' मेळाव्याअंतर्गत स्नेहसंमेलन रंगले.

# कलाविष्कारांनी रंगले विद्यार्थी-पालकांचे स्नेहसंमेलन

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात बुधवारी 'आजी-माजी विद्यार्थी आणि पालक' मेळाव्याअंतर्गत स्नेहसंमेलन रंगले. त्यात विद्यार्थ्यांनी वैविध्यपूर्ण कलाविष्कार सादर केले.

कार्यक्रमाची सुरुवात भरतनाट्यम्च्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या सुंदर नृत्याविष्काराने झाली. अधिविभागातील चित्रकलेच्या विद्यार्थ्यांनी काढलेली सुरेख व्यक्तिचित्रे, निसर्गचित्रे आणि रेखाचित्रे आणि रांगोळी यांची प्रात्यक्षिके लक्षवेधी ठरली. हार्मोनियमच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सामूहिक वादन कौतुकास्पद ठरले. नाट्यशास्त्र सर्टिफिकेट आणि डिप्लोमाच्या विद्यार्थ्यांनी 'विंडो सीट' ही लघुनाटिका सादर केली. सद्यःस्थितीतील 'वृक्षतोड' या ज्वलंत विषयावर आधारित 'घुसखोर' या मूकनाट्याने उपस्थितांना अंतर्मुख केले. विजया पाटील, आर्या मोहिरे यांनी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाची माहिती व वाटचाल याविषयावर सादर केलेले संवादरुपी 'प्रहसन' अत्यंत लक्षवेधी आणि माहितीपूर्ण ठरले. कार्यक्रमात संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी प्रास्ताविक केले. कवी डॉ. चंद्रकांत पोतदार यांनी कलेचे महत्त्व अधोरेखित केले. अतुल परीट यांनी सूत्रसंचालन केले. विकास कांबळे, राज पाटील, अमित साळोखे, पद्मश्री बागडेकर, संदेश गावंदे, ओंकार सूर्यवंशी, बबन माने, विजय उपाध्ये, विक्रम परीट, संजय तोडकर, मल्हार जोशी यांनी संयोजन केले.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAR 2026
सकाळ

# डॉ. आलोक जत्राटकर यांच्या पुस्तकाला 'मारोतराव नारायणे' पुरस्कार

**कोल्हापूर :** येथील शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी तथा लेखक डॉ. आलोक जत्राटकर यांच्या 'समाज आणि माध्यम' या वैचारिक लेखसंग्रहाला वर्धा येथील मारोतराव नारायणे स्मृती प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय उत्कृष्ट वैचारिक साहित्य पुरस्कार जाहीर झाला. रोख सहा हजार रुपये, मानपत्र व सन्मानचिन्ह, असे पुरस्काराचे स्वरूप आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. प्रमोद नारायणे यांनी ही घोषणा केली. डॉ. जत्राटकर यांच्या 'ब्लॅक व्हाईट अन् ग्रे' या पुस्तकाला नुकताच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या ईश्वरपूर शाखेच्या वतीने उत्कृष्ट ललित संग्रहासाठीचा राज्यस्तरीय पुरस्काराने गौरवले. मारोतराव नारायणे यांच्या स्मृतिदिनानिमित्त २५ एप्रिलला सायंकाळी साडेसहा वाजता वर्धा येथील स्थानिक सार्वजनिक बजाज वाचनालयाच्या सभागृहात साहित्यिक व 'उपरा'कार लक्ष्मण माने यांच्या हस्ते वितरण होईल, अशी माहिती डॉ. नारायणे यांनी दिली.